CoverageReport: TCS IT Wiz – Pune Edition

**Publication:**Prabhat
**Date:**09/08/2014
**Edition:** Pune
**Page No:** 9
**Headline:**TCS IT WIZ 2014 on August 12

# टीसीएस आयटी विझची पुणे फेरी १२ ऑगस्ट रोजी

पुणे, दि. ८– टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस अर्थात टीसीएसने टीसीएस आयटी विझ २०१४ च्या पुणे फेरीची घोषणा केली आहे. १२ ऑगस्ट, मंगळवार रोजी टीसीएस आयटी विझ पुण्यातील कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात पार पडेल. इयत्ता आठवी ते बारावीतील विद्यार्थी (कनिष्ठ महाविद्यालयातील पीयू विद्यार्थ्यांसह) टीसीएस आयटी विझमध्ये सहभागी होणार आहेत. क्वीझमधे लेखी प्राथमिक परीक्षेत यशस्वी झालेल्या पहिल्या सहा संघांना विभागीय अंतिम फेरीत सहभागी होता येईल. विभागीय अंतिम फेरीत विजेत्या ठरलेल्या संघाला डिसेंबरमध्ये होणार असलेल्या महाअंतिम फेरीत सिंगापूर व यूएइ येथील संघांसह सहभागी होण्याची संधी मिळेल. टीसीएस आयटी विझ हा १९९९ साली भारतात सुरू करण्यात आलेला सर्वात मोठा आंतरशालेय आयटी क्वीझ उपक्रम आहे. माहिती तंत्रज्ञान कौशल्ये विकसित करणे, विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन मिळवून देणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. आजच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये माहिती तंत्रज्ञान हा यशाकडे नेणारा मार्ग आहे. ही क्वीझ म्हणजे संगणक विज्ञान व माहिती तंत्रज्ञान यांचे ज्ञान वाढवणारे प्रभावी माध्यम आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे ज्ञान वाढेल.